# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## अपिल क्रमांक : के.आर-३०३/२०२१ (तक्रार)

**तक्रारकर्ता,** श्री.संतोष विकास सावरकर
श्री सिध्दिसागर एस.आर.ए.सहकारी गृह.संस्था
दुसरा मजला, रूम नं.२१०, वरळीगांव बसडेपो जवळ
वरळी, मुंबई ४०० ०३०

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद
ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद
ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २९.४.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १७.११.२०२० | २.१२.२०२० | १५.१२.२०२० | १४.१.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.८.२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये "प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २९.४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्त्यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे ख़ालीलप्राणे माहिती मागितली आहे.

"(ग्रुप ग्रामपंचायत काशिद दप्तरी नोंद असलेल्या असेसमेंट नोंद वहीत नोंद असलेल्या मालमत्ता क्रमांक (घर क्रमांक) ११२, १७२, १७३ व २५३ बद्दल माहिती मिळणेबाबत.)"

(१) उपरोक्त विषयांकित घरबांधकाम ना-हरकत दाखला मिळण्याकरीता केलेल्या अर्जाची त्यासोबत जोडण्यासत आलेल्या सर्व कागदपत्रांच्या व त्याच्या आवक नोंद रजिस्टर नोंद वहीची छायांकित प्रत साक्षांकित करून मिळाव्यात.

(२) उपरोक्त विषयांकित अर्जाच्या अनुषंगाने ग्रुप ग्रामपंचायत काशिद ग्रामपंचायत काशिद यांनी घेतलेल मासिकसभेच्या ठरावाची छायांकित प्रत साक्षांकित करून मिळाव्यात.

(३) उपरोक्त विषयांकित देण्यात आलेल्या ना-हरकत दाखल्याची व त्याच्या जावक रजिस्टर नोंद वहीतील जावक नोंदणी क्रमांकाचीं छायांकित प्रती साक्षांकित करून मिळाव्यात.

(४) उपरोक्त विषयांकित घर बांधकाम पूर्ण केल्यानंतर एसेसमेंट आकारणी करीता केलेल्या अर्जाची व त्या सोबत जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडील बांधकाम परवानगीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रत साक्षांकित करून मिळावी.

(५) उपरोक्त विषयांकित घराच्या एसेसमेंट आकारणीसाठी घेण्यात आलेल्या ठरावाची व त्या नुसार आकारण्यात आलेल्या एसेसमेंट नमुना ८ नोंद वहीच्या छायांकित प्रती साक्षांकित करून मिळाव्यात.

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "जन माहिती अधिकारी माहिती देण्यास कसूर करीत असलेबाबत." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.

"आपणास या पत्राद्वारे कळविण्यात येत आहे की, आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये जी माहिती मागितली होती त्यानुसार ग्रामपंचायत काशिद हद्दिमध्ये काशिद, सर्वे व चिकणी या गावांचा समावेश आहे तरी आपल्याला कोणत्या गावातील माहिती पाहिजे आहे याचा बोध होत नसल्यामुळे आपल्याला आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून देता येत नाही. तरी आपण योग्य त्या गावाचा उल्लेख करावा त्यानुसार आपणास माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार कलम ६ अन्वये सर्वसाधारणपणे दिडशेपेक्षा अधिक शब्द नसावेत."

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.१.२०२१ रोजी सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"अर्जदार श्री. उदय सहदेव नागवेकर यांनी त्यांचेकडील अर्ज दि.१७.११.२०२० अन्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. पं. काशिद यांनी दप्तरी शोध घेऊन मौजे काशिद, चिकणी, सर्वे या तीनही गावांची माहिती २० दिवसांच्या आत अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी. (५०० प्रती विनामुल्य देणेत यावेत ५०० वरील प्रती नियमानुसार फी आकारून देणेत यावेत)."

जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी तक्रारकर्ता यांनी असा युक्तिवाद केला की, प्रथम अपिलिय अधिकारी यांचा आदेश झाल्यानंतरसुध्दा अद्यापपर्यंत त्यांना माहिती देण्यात आलेली नाही. प्रथम अपिलिय अधिकारी यांनी त्यांच्या दि.१४.१.२०२१ रोजीच्या आदेशामध्ये उपरोक्तप्रमाणे निर्णय दिला आहे. तथापि, असा आदेश होऊनदेखील तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. सबब, माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसापोटी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु. २५,०००/-) एवढी शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत विचारणा करणारी "कारणे दाखवा" नोटीस पाठविणे उचित होईल.

तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली उपलब्ध माहिती त्यांना १५ दिवसांत विनामुल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय काशिद यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात समक्ष/नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय काशिद यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक १७.११.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा **लेखी खुलासा त्यांनी दि.२९.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोगाकडे व्यक्तीश: सादर करावा. अन्यथा त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२९.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

४. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ एप्रिल, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद, ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१
**- यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद, ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१ **यांचेमार्फत रवाना.**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## अपिल क्रमांक : के.आर-२६१/२०२१ (तक्रार)

**तक्रारकर्ता,** श्री.संतोष विकास सावरकर
श्री सिध्दिसागर एस.आर.ए.सहकारी गृह.संस्था
दुसरा मजला, रूम नं.२१०, वरळीगांव बसडेपो जवळ
वरळी, मुंबई ४०० ०३०.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद
ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद
ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २९.४.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २.३.२०२० | ----- | १७.११.२०२० | २४.१२.२०२० |

तक्रारकर्ता यांनी दि.२.२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी माहिती देण्यास कसुर करीत असलेबाबत." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच नुकसान भरपाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २९.४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" (ग्रुप ग्रामपंचायत काशिद दप्तरी नोंद असलेल्या गाव/मौजे सर्वे, प्रचलित गट नंबर १८६ मध्ये असलेल्या घराबद्दल माहिती मिळण्याकरीता अर्ज.) "

(१) उपरोक्त विषयांकित घर बांधकाम ना-हरकत दाखला मिळण्याकरीता केलेल्या अर्जाची त्यासोबत जोडण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांच्या व त्याच्या आवक नोंद रजिस्टर नोंद वहीची छायांकित प्रती साक्षांकित करून मिळाव्यात.

(२) उपरोक्त विषयांकित अर्जाच्या अनुषंगाने ग्रुप ग्रामपंचायत काशिद यांनी घेतलेल्या मासिकसभेच्या ठरावाची छायांकित प्रती साक्षांकित करून मिळाव्यात.

(३) उपरोक्त विषयांकित देण्यात आलेल्या ना-हरकत दाखल्याची व त्याच्या जावक रजिस्टर नोंद वहीतील जावक नोंदणीक्रमांकाची छायांकित प्रती साक्षांकित करून मिळाव्यात.

(४) उपरोक्त विषयांकित घर बांधकाम पूर्ण केल्यानंतर एसेसमेंट आकारणी करीता केलेल्या अर्जाची व त्या सोबत जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडील बांधकाम परवानगीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करून मिळावी.

(५) उपरोक्त विषयांकित घराच्या एसेसमेंट आकारणीसाठी घेण्यात आलेल्या ठरावाची व त्यानुसार आकारण्यात आलेल्या एसेसमेंट नमुना ८ नोंद वहीच्या छायांकित प्रती साक्षांकित करून मिळाव्यात.

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती देण्यास कसूर." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल आदेशानंतरही तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.१२.२०२० रोजी सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"१. अपिल मान्य करण्यात येत आहे. २. अर्जदार श्री. नागवेकर यांनी त्यांचेकडील अर्ज दि.२.३.२०२० अन्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक , ग्रामपंचायत काशिद यांनी ग्रा. पं. दप्तरी शोध घेऊन १५ दिवसांच्या आत विनामूल्य देणेत यावी. (५०० प्रती विनामुल्य व त्या पुढील प्रती नियमानुसार फी आकारून देणेची आहे)."

जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी तक्रारकर्ता यांनी लेखी निवेदन सादर केले. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांचेविरुध्द कारवाईची मागणी केली आहे.

प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रथम अपिलिय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसांत माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. तरीसुध्दा अदयापपर्यंत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. सबब, तक्रारकर्ता यांना झालेल्या विलंबासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतका दंड का करण्यात येऊ नये तसेच त्यांचेविरुध्द विभागीय कारवाई का करण्यात येऊ नये याची विचारणा करणारी **"कारणे दाखवा"** नोटीस पाठविणे उचित होईल.

तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली उपलब्ध माहिती त्यांना १५ दिवसांत विनामुल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय काशिद यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय काशिद यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २.३.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा **लेखी खुलासा त्यांनी दि.२९.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोगाकडे व्यक्तीश: सादर करावा. अन्यथा त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२९.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

४. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ एप्रिल, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद, ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१

<u>- यांना प्रत</u> विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काशीद, ता.मुरूड, जि.रायगड ४०२ ४०१ <u>यांचेमार्फत रवाना.</u>

## अपिल क्रमांक : के आर-३०३/२०२१ (तक्रार)
## अपिल क्रमांक : के.आर- २६१/२०२१ (तक्रार)
## तक्रारकर्ता, श्री.संतोष विकास सावरकर
## सुनावणी दिनांक २९.०५.२०२४ ( In Continuation of order dt.२९.०४.२०२४)

### विवेचन

तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे दि.०९.०२.२०२१ रोजी तक्रार क्रमांक ३०३/२०२२ व दि.०४.०२.२०२२ रोजी तक्रार क्रमांक २६१/२०२१ अशा दोन तक्रार अर्ज दाखल केले आहेत. या दोन्ही तक्रारींमध्ये तक्रारकर्ता यांनी एकाच प्रकारची माहिती मागीतली आहे. सदर तक्रार अर्जांवर आज दिनांक २९.०५.२०२४ रोजी एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अविनाथ मधुकर पिंपळकर व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुशांत सुभाष ठाकूर, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, काशिद, ता.मुरुड, जि.रायगड उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत काशिद यांना अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबत खुलासा सादर करण्याचे आदेश दि.२९.०४.२०२४ रोजी देण्यात आले होते. मात्र त्यांनी आज लेखी खुलासा सादर केला नाही. त्यांनी आपल्या तोंडी खुलाश्यामध्ये असे सांगितले की, त्यांनी अपिलार्थी यांना दि.०२.१२.२०२० रोजी पत्र देऊन, त्यांना कोणत्या गावातील माहिती पाहिजे याचा बोध होत नसून, योग्य त्या गावाचा उल्लेख स्पष्ट करावा त्यानुसार माहिती उपलब्ध करुन देण्यता येईल, असे कळविले होते. तथापि अपिलार्थी यांनी स्पष्ट गावाचा उल्लेख केला नसल्यामुळे त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा बोध न झाल्यामुळे, त्यांना माहिती देण्यात आलेली नाही.

या दोन्ही तक्रार अर्जामध्ये तक्रारकर्ता यांनी एकाच माहितीची मागणी केली आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२२.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविलेली आहे. सदर माहिती तक्रारकर्ता यांना प्राप्त झालेली आहे. तक्रारकर्ता यांनीही सुनावणी दरम्यान त्यांना माहिती प्राप्त असल्याचे मान्य केले आहे. तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त झालेली असली, तरी देखिल अपिलीय प्राधिकारी यांनी या प्रकरणात दुर्लक्ष केले आहे, त्यामुळे त्यांचेविरुध्द विभागीय कारवाई व तक्रारकर्ता यांना नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी तक्रारकर्ता यांनी त्यांच्या युक्तीवादात केली आहे.

सदर दोन्ही तक्रारींच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तक्रारकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना संपूर्ण आकलन झालेले नाही. त्यांनी याबाबत तक्रारकर्ता यांचेकडे निश्चित कोणत्या गावाची माहिती पाहिजे याची विचारणा केली होती. मात्र त्याला उत्तर देण्याऐवजी तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिल दाखल केले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या ग्रामपंचायती अंतर्गत असलेली तीनही गावे म्हणजेच मौजे काशिद, चिकणी व सर्वे यां तिनही गावांची माहिती देणेबाबत आदेशित केले आहे. या आदेशानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्राकरर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी त्यावेळस दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. यामध्ये दोन्ही पक्षांतर्फे तांत्रिक बाबी उपस्थित करुन वेळ घालवण्यात आल्याचे सुध्दा लक्षात येते. परिणामी तक्रारकर्ता यांना माहिती मिळण्यास विलंब झालेला आहे.

सुनावणीच्यावेळी झालेल्या युक्तीवादात असे लक्षात आले की, दोन्ही पक्षांचे स्थानिक स्तरावर एकमेकांना सहकार्य नाही व कदाचित माहिती मिळविणे हा प्रमुख उद्देश बाजुला राहून केवळ तांत्रिक मुद्यांमध्ये वेळ घालविण्यात तक्राकरर्ता यांना तसेच जन माहिती अधिकारी यांना जास्त स्वारस्य आहे असे दिसते. परिणामी माहिती अधिकार अधिनियमाचा जो उद्देश आहे त्याची पूर्तता होत नाही. माहिती प्राप्त करण्याच्या प्रक्रियेमध्ये दोन्ही पक्षांनी एकमेकांना योग्य सहकार्य केले तर त्याचा उद्देश अधिक चांगल्या पध्दतीने सफल होऊ शकतो. मात्र दुर्देवाने या प्रकरणात असे झाल्याचे दिसून येत नाही.

तक्रारकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याचे आदेश देणे याप्रकरणी योग्य होणार नाहीत. कारण त्यांचेकडून जन माहिती अधिकारी यांना जे सहाकर्य करणे अपेक्षित होते ते सहाकार्य त्यांनी केलेले दिसून येत

नाही. याउलट ते तांत्रिक बाबीमध्ये जास्त अडकून पडले म्हणून त्यांना नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार आहे असे वाटत नाही. त्यांची ही विंनती फेटाळून लावण्यता येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा एकूणच याप्रकरणाकडे बघण्याचा दृष्टीकोन अनास्थेचा दिसून आला आहे. आजच्या सुनावणीच्या वेळी त्यांना लेखी खुलासा सादर करणेबाबत आदेशित करण्यात आलेले असतना सुध्दा ते तसा खुलासा सादर करु शकले नाहीत. त्यामुळे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबासाठी ते निश्चितपणे जबाबदार आहेत असे दिसून येते. म्हणून त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अविनाथ मधुकर पिंपळकर, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, खालापूर यांना आयोगाने दि.२९.०४.२०२४ रोजीच्या आदेशान्वये खुलासा सादर करणेबाबत आदेशित कलेले असतानासुध्दा त्यांनी त्यांचा लेखी खुलासा सादर केला नाही. तसेच त्यांनी केलेला तोंडी खुलासा हा समाधानकारक नाही. त्यामुळे त्यांना दि.२९.०४.२०२४ रोजीच्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यातयेत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.२५,०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ५ मासिक हप्त्यात वसुल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकिय सेवा, ६०, इतर सेवा, ८००- इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६-१) या अर्थ संकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुरुड, ता.मुरुड, जि.रायगड यांनी आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ मे, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२. उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती मुरुड, ता.मुरुड, जि.रायगड.
४. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुरुड, ता.मुरुड, जि.रायगड.
५. आहरण व संवितरण अधिकारी, पंचायत समिती मुरुड, ता.मुरुड, जि.रायगड. .
६. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अविनाश मधुकर पिंपळकर तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, काशिद, ता.मुरुड, जि.रायगड.

-**यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, काशिद, ता.मुरडड, जि.रायगड.
**यांचे मार्फत प्रत रवाना**).